शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, चंद्रपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालयाकरिता पाणी पुरवठा योजनेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : जीसीसी-२०२६/प्र.क्र.३३३/प्रशा-१,
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, नवीन गो.ते.संकुल,
९ वा मजला, मंत्रालय, मुंबई -४०० ००१.
दिनांक : ०४ ऑगस्ट, २०२६

वाचा : आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्रमांक: संवैशिवसं/चंद्रपूर बांधकाम/पाणीपुरवठायोजना/२४५३/आय-प/२६, दिनांक १२.०६.२०२६.

शासन निर्णय :

विभागाच्या नियंत्रणाखालील चंद्रपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय संकुलास दैनंदिन वापर व पिण्याकरीता आवश्यक पाणी पुरवठा आमडी बॅरेजवरुन उपलब्ध करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, नागपूर यांनी तांत्रिक मान्यता दिलेल्या पाणी पुरवठा अंदाजपत्रक रुपये २६,१४,९०,८२०/- (अक्षरी सव्वीस कोटी चौदा लक्ष नव्वद हजार आठशे वीस रुपये मात्र) (सर्व करांसहित) इतक्या रक्कमेच्या पाणी पुरवठा अंदाजपत्रकास पुढील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अ.क्र.	**बांधकामाचे नाव**	**एकूण अंदाजित किंमत**
१.	Water Supply Scheme to Government Medical College & Hospital Chandrapur	२६,१४,९०,८२०/-
	एकूण रक्कम	२६,१४,९०,८२०/-

<u>अटी</u> :-

१) सदर काम करण्यापूर्वी आवश्यक अशा सर्व परवानग्या घेण्याची पुर्तता करण्यात यावी.

२) प्रस्तुत काम पुरातत्व विभागाच्या अखत्यारित येत असल्यास संबंधित विभागाची तसेच महानगरपालिका व तत्सम प्राधिकरणे यांची पूर्व परवानगी घेण्यात यावी.

३) तांत्रिक मंजूरी देताना राज्य दरसूचीबाह्य बाबींच्या दराकरीता शासन परिपत्रक क्रमांक - २०१७/प्र.क्र.११/नियोजन-३,दिनांक ११.०४.२०१७ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

४) प्रस्तावातील खरेदीशी संबंधित बाबींकरीता ई-निविदा प्रणालीचा अवलंब करुन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दिनांक २४.०८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या सूचना विचारात घ्याव्यात.

५) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय, इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/ तां.क्र.१, दिनांक १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी.

६) पाणी पुरवठा योजनेच्या कामाच्या कालावधीतच स्थापत्य, विद्युतीकरणाबाबत तसेच इतर अनुषंगिक कामांचे योग्य नियोजन करुन सदर कामे पूर्ण करावीत.

७) विषयांकित कामाकरीता सुधारीत प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता लागणार नाही, याद्दष्टीने विशेष दक्षता घेऊन काम करण्यात यावे.

८) सदर पाणी पुरवठा योजनेची कार्यान्वीत यंत्रणा चंद्रपूर महानगरपालिका, चंद्रपूर असेल. त्यांनी सदर पाणी पुरवठा योजनेची निविदा प्रक्रिया तातडीने पूर्ण करून तात्काळ काम सुरू करावे.

२. प्रस्तुत पाणी पुरवठा योजनेसाठी येणारा खर्च खालील लेखाशीर्षात मंजूर होणाऱ्या व वितरीत निधीतून भागविण्यात यावा.

मागणी क्रमांक एस-४

४२१०	-	वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च
०३	-	वैद्यकीय शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन
१०५	-	विषमचिकित्सा-राज्य योजनांतर्गत योजना
(००) (५३)	-	शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद महाविद्यालये व रूग्णालयांची विनिर्दिष्टीत कामे केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील सार्वजनिक उपक्रम असलेल्या कंपनीकडून वा तत्सम कंपनीकडून टर्न की तत्वावर करून घेणेबाबत.
४२१० २६२५	-	(५३-मोठी बांधकामे)

३. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/ विनियम, भाग-२, दिनांक २०.०९.२०१९ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-१, उप विभाग-५, अनुक्रमांक-१, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक १३४ (१) नुसार प्रशासकीय विभागाला प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८०४१५३५४५४७५१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUDHIR JAYA SHETTY

Digitally signed by SUDHIR JAYA SHETTY
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT,
2.5.4.20=72ea277025fdf5a4898b244953b82406eea05963bc456f1e1e8621e5917d8305, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E9D37D499A521B728AEB3DC8EC38B759420308B9FD7816002B4AF0FFBF1111D7, cn=SUDHIR JAYA SHETTY
Date: 2026.08.04 19:32:53 +05'30'

(सुधीर जया शेट्टी)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त (वै.शि.), वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई.

२) महालेखाकार - १ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई.
३) आयुक्त, चंद्रपूर महानगरपालिका, चंद्रपूर
४) संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई.
५) मुख्य अभियंता, चंद्रपूर महानगरपालिका, चंद्रपूर
६) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, नागपूर
७) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, चंद्रपूर.
८) जिल्हा कोषागार अधिकारी, चंद्रपूर.
९) निवडनस्ती (प्रशा-१).